## उपवनसंरक्षक (प्रादे) अकोला वनविभाग अकोला यांचे कार्यालय

वसुंधरा हॉल, अशोक वाटीकेसमोर अकोला ४४४००१ फोन क्रमांक ०७२४-२४१५६०० ईमेल-dycfakola@mahaforest.gov.in


आदेश क्रमांक 31 दिनांक 27/05/2026

संदर्भ:- 1.महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध 2005

2.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2017/प्र.क्र.415/कार्यासन-12/ दि.9.4.2018

3.दिनांक 27.5.2025 रोजी आयोजित विभागीय नागरी सेवा मंडळाची सभा

-----00000-----

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होण-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 अन्वये तसेच विभागीय स्तरावर गठीत केलेल्या नागरी सेवा मंडळाची बैठक दिनांक 27.5.2025 रोजी संपन्न झाली सदर बैठकीत नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार खालील प्रमाणे वाहन चालकांचे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी प्रशासकीय कारणास्तव बदली व पदस्थापना करण्यात येत आहे.

| अक्र | वाहन चालकाचे नांव व पदनांम | कार्यरत ठिकाण | बदली नंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | मंगेश तराळे | वि. कार्या. अकोला | सहाय्यक वनसंरक्षक (वने) अकोला | रिक्त पदावर |

1.सदर बदली व पदस्थापना झालेल्या वाहन चालकांना बदलीचे ठिकाणी रुजु होण्याकरीता कोणत्याही सबबीचा विचार न करता स्थानीक व्यवस्था करुन दिनांक 29.05.2026 रोजी पर्यंत कार्यमुक्त करावे व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच संबंधीत वाहन चालक बदलीचे ठिकाणी रुजु झाल्यानंतर तसा रुजु अहवाल या कार्यालयास सादर करावा.

2. वरील संबंधीत कर्मचारी यांचे नविन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होईपर्यंत या कार्यालयाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजुर करणे, तसेच म.ना.से (रजा) नियम 1981 मधील नियम (सी) नुसार मुळ कार्यालयात बदली झालेल्या वाहन चालक यांचे कोणत्याही प्रकारच्या रजेचे अर्ज स्वीकारु नये. तसे अर्ज प्राप्त झाल्यास संबंधीत वाहन चालकांना नोंदनिपोच डाकेने संबंधीतांना परत करावे.

3. बदली ही संपुर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे संबंधीत कर्मचा-याने राजकीय दबाव वापरल्यास म.ना.से (वर्तणुक) नियम 1981 मधील नियम 23 चा भंग केला म्हणुन ती कृती शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

4. *बदली झालेल्या कर्मचारी यांना दिनांक 29.05.2026 रोजी पर्यंत कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच बदली झालेल्या कर्मचारी यांचे तदनंतर वेतन अदा करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.*

**सुमंत एस. सोळंके (भा.व.से)**
**उपवनसंरक्षक**
**अकोला वनविभाग अकोला**

क्रमांक कक्ष/आस्था/ 419 /2026-27
अकोला दिनांक 27.05.2026

प्रति,
वर निर्देशित वाहन चालक

प्रतिलिपी:- मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादे) अमरावती वनवृत्त अमरावती यांना माहितीस सविनय सादर.

प्रतिलिपी:- सहा.वनसंरक्षक वने अकोला यांना माहितीस करीता अग्रेषित.

प्रतिलिपी:- कार्यालय अधिक्षक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना. बदली झालेल्या वाहन चालकांना पदस्थापनेचे ठिकाणी रुजु होण्याकरीता दिनांक 29.05.2026 रोजी पर्यंत कार्यमुक्त करुन तसा कार्यमुक्तीचा दिनांक या कार्यालयास तात्काळ सादर करावेत.